# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. २५ नोव्हेंबर,२०१९

जळगाव दि.२५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ.आंबेडकर विचारधारा व इतिहास विभागाच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान गौरव दिनाच्या निमित्ताने “उपेक्षित लोकशाही: न उलगडलेले डॉ.बी.आर.आंबेडकर” या विषयावर प्रा.डॉ.अनिल डोंगरे, विभाग प्रमुख डॉ.बाबासाहेब विचारधारा, यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या संचालक प्रा.डॉ. अर्चना देगावकर राहणार आहेत. तर संगणशास्त्र प्रशाळेचे प्रा.डॉ. आर.जे.रामटेके, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.उमेश गोगाडीया, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारी २.३० वाजता सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या ग्रंथालय सभागृहात व्याख्यान होणार असून सुरवातीस संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात येणार असल्याचे डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे सहाय्यक प्रा.विजय घोरपडे, हर्षल पाटील, अरुण अवसरमल यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क  धिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.२५ (                ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील परीक्षा विभागातील कर्मचारी अरविंद पंडित सोनवणे यांनी महाविद्यालयीन कर्मचाऱ्याचे १२ हजार रुपयांचे हरविलेले पैशांचे पाकिट प्रामाणिकपणे परत करुन अजूनही प्रामाणिकपणा समाजात कायम असल्याचे दाखवून दिले.

तळोदा येथील समाजकार्य महाविद्यालयाचे लेखापाल संजय पटेल हे सोमवारी विद्यापीठात कार्यालयीन कामासाठी आले होते. त्यांच्या खिशातून पैशाचे पाकीट परीक्षा विभागात हरविले. स्वत: पटेल यांना पाकीट हरविल्याची कल्पना नव्हती. परीक्षा विभागाच्या तीसऱ्या मजल्यावरील लिफ्ट जवळ विद्यापीठातील कर्मचारी अरविंद सोनवणे यांना हे पाकिट सापडले. त्यांनी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांच्या कार्यालयात ते जमा केले. पाकिटातील व्हिजीटिंग कार्डवर नमूद केलेल्या मोबाईलवर संजय पटेल यांच्याशी संपर्क साधुन त्यांना कार्यालयात बोलावून घेण्यात आले तो पर्यंत पाकीट हरविल्याची पटेल यांना देखील कल्पना नव्हती. संचालक बी.पी.पाटील व अरविंद सोनवणे यांनी श्री पटेल यांच्याकडे हे पाकिट हस्तांतरीत केले या पाकिटात १२ हजार रूपये, एटीएम आणि महत्वाची कागदपत्रे होती. सोनवणे यांच्या प्रामाणिकपणा बद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कौतूक केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्दी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी